**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची मंगळवार दिनांक 06.02.2018 रोजी दुपारी 2.00 वाजता मा.सभापती वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती यांच्या कक्षात भरलेल्या आढावा सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्री.मनोज चापले यांचे सह मा.सदस्य श्री. लखन येरवार, मा.सदस्य श्री. विजय चुटेले, मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके, मा.सदस्या श्रीमती वंदना चांदेकर, मा.सदस्या विशाखा बांते आणि विशेष आमंत्रित मा.सदस्या श्रीमती मनिषा कोठे, मा. सदस्या श्रीमती मनिषा अतकर तसेच विभागाकडून आरोग्य अधिकारी(स्वच्छता) डॉ.दासरवार, मलेरिया फायलेरिया अधिकारी, सर्व झोनचे झोनल अधिकारी उपस्थित होते.

विषय क्र. 1:– दि.11.01.2018 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्ताला कायम करण्यात आले.

विषय क्र. 2. आरोग्य विभागाच्या(स्वच्छता) कामकाजाबाबत मा.सभापती यांनी निर्देशित केले, आरोग्य विभाग हा फार मोठा विभाग असल्यामुळे तसेच शहरातील साफ सफाई वर देखरेख व नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने कर्मचारी वर्ग अपूरा असल्यामुळे याआधी जे शिक्षित सफाई कर्मचा–यांना एस.ऑय चा कार्यभार देण्यात आले होते त्यांची सध्या हिवताप व हत्तीरोग विभागात पदोन्नती झाली आहे. हया सर्व पदोन्नत झालेल्या कर्मचा–यांना साफ सफाईवर देखरेख व नियंत्रणासाठी स्वास्थ्य निरीक्षकाचा(स्वच्छता) कार्यभार देण्यात यावे जेणेकरून शहरातील साफ सफाई योग्य प्रकारे होईल.

विषय क्र.3. म.न.पा. ठराव क्र. 156 दि. 08.12.2017 अन्वये OPD क्लिनिक व्यवसायिक नामांकनासाठी सर्वकष धोरण ठरविण्याबाबत चर्चा

मागच्या सभेत समितीने क्लिनिक व्यवसायिक नामांकनासाठी शुल्क आकारण्याचे ठरविले होते. हे शुल्क एप्रिल 2018 पासून लागू करण्यासाठी मनपा सभागृहाची मंजुरी घेऊन कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करते तसेच क्लिनिक व्यवसायिक नामांकनासाठी शर्ती व अटीबाबत नविन धोरणानुसार आवश्यक कागदपत्र गोळा करण्यात यावे. याबाबत संयुक्त समिती गठीत करून त्वरित निर्णय झाल्यावर त्वरित मनपा सभेसमोर मंजुरीस्तव पाठवावी असे मा.सभापती यांनी निर्देशित केले.

मा.सभापती यांनी सुचित केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येते. यास समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

| | |
|---|---|
| 1.सभापती | अध्यक्ष |
| 2.उपायुक्त | सदस्य |
| 3.आरोग्य अधिकारी(एस) | सदस्य |
| 4.सी.सी.ए. कोर्ट एजन्ट | सदस्य |
| 5.प्रतिनिधी आयएमए | सदस्य |
| 6.प्रतिनिधी एडीटीपी | सदस्य |

विषय क्र.4:– स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केलेल्या कार्यवाही बाबत चर्चेच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी झोनवाईज आढावा घेतला असता सर्व झोनमार्फत स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत साफ सफाई सुरू असल्याचे सांगण्यात आहे.

आरोग्य अधिकारी डॉ.दासरवार यांनी माहिती देतांना सांगितले कि, स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत शासनाची टीम 15 फेब्रुवारीपर्यंत नागपूर शहरात सर्वेक्षणासाठी येणार आहे. सर्वेक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे पुर्ण तयार करण्यात आले आहेत. नागपूर शहराचे पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण असे चार भागात विभागणी करून त्याप्रमाणे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. टीमद्वारे प्लॅान एरिया, अनप्लॉन एरिया, स्लम, सीटीपीटी, बसस्टॉप, रेल्वे स्टेशन, मार्केट या भागांची पाहणी करण्यात येणार आहे. त्यानुसार झोन स्तरावर स्वच्छतेचे काम सुरू आहे. सार्वजनिक शौचालय, रेल्वे स्टेशन, बसस्टॅन्ड या भागांवर लक्ष केंद्रीत करून साफ सफाईचे काम सुरू आहे. याकरिता आयुक्त महोदयांनी रेल्वेच्या अधिका–यांसोबत पाहणी केलेली आहे. या सर्व बाबींवर शहराला गुण मिळणार आहेत. मागच्या वेळेस आपण सिटीझन फिडबॅक गुणांकनावर कमी पडलो त्यामुळे फिडबॅक विषयी नागरिक आणि कार्यकत्यांकडून चांगले फिडबॅक यावे असे अपेक्षित आहे असेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर मा.सदस्या श्रीमती मनिषा अतकर यांनी सभेत प्रभागातील स्वच्छतेच्या संदर्भात चर्चा करतांना सांगितले कि, प्रभाग क्र. 4 हा आऊटर भाग आहे. प्रभागात 3 कचरा गाडया आणि चार ते पाच हातगाडया आहेत. प्रभागात कचरा उचलण्यासाठी दहा–दहा दिवस गाडया येत नाही आणि कचरा तसाच राहतो. कच–याचे कलेक्शन होत नाही. सुपरवायजरला सांगून पाहणी केली असता कमीतकमी 4 मोठया गाडया आणि 6 हातगाडया पाहिजे. जर दोन–तीन दिवसात याबाबत कुठल्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यास प्रभागातील सर्व महिला आंदोलन करतील करिता समस्यांचे निराकरण करण्यात यावे आणि प्रभागात कनक कंपनीच्या प्रतिनिधीमार्फत दौरा करण्यात यावा असेही त्या म्हणाल्यात.

मा.सदस्या श्रीमती मनिषा कोठे यांनी सुध्दा चर्चेत भाग घेतांना सांगितले कि, प्रभाग क्र. 26 हा आऊटर भाग आहे. प्रभागात सहा–सहा दिवस कचरा उचलण्यासाठी गाडया येत नाही. सुपरवायजरला या संदर्भात सांगूनही कार्यवाही होत नाही. संबंधित अधिका–याला वारंवार फोन करूनही फोन उचलल्या जात नाही. खाली प्लॉटवर मोठया प्रमाणात कचरा टाकला जातो. या अनुषंगाने आमच्या प्रभागाचा दौरा करण्यात यावा.

यावर कनक कंपनीच्या प्रतिनिधीने प्रभाग क्र. 26 चा दौरा आणि प्रभाग क्र. 4 चा दौरा केला जाईल असे सांगितले.

या अनुषंगाने मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, मा.सदस्यांच्या तक्रारीचे निवारण 2 दिवसात करण्यात यावे. कनक कंपनीच्या प्रतिनिधीने सांगितल्याप्रमाणे मा.सदस्यांच्या प्रभागाचा दौरा करण्यात यावा. या दौ–यात सभापती यांचा सुध्दा सहभाग राहील याची संबंधितांनी नोंद घ्यावी. मा. सदस्यांनी आपल्या अडचणी संदर्भात संबंधित अधिका–यांस फोन केला असता त्याला प्रतिसाद देण्यात यावा. काही प्रभागात अतिरिक्त सफाई कर्मचारी आहेत तर काही प्रभागात सफाई

कर्मचा–यांची कमतरता आहे त्यामुळे मा.सदस्यांनी नेहमी ओरड असता ही बाब लक्षात घेता आता नव्याने रस्त्यांच्या बीटची आखणी विभागामार्फत करण्यात यावी.

मा.सदस्य श्री. येरवार यांनी सुचित केले कि, प्रभागातील कच–याची उचल केल्यानंतर कचरा घर येथे जेव्हा गाडी जाते तेव्हा ओला आणि सुखा कचरा एकत्रितपणे टाकल्या जातो. जर अशाप्रकारे ओला आणि सुखा कचरा एकत्र होत असेल तर कचरा विलगीकरण करण्याचा फायदा काय? याबाबत विभागाने योग्य कार्यवाही करावी.

मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके यांनी सांगितले कि, प्रभाग क्र. 8 मध्ये कचरा उचलायला गाडया येत नाही. कचरा सर्वत्र पसरलेला असतो. कचरा गाडया तुटलेल्या आहेत त्यांना ठेवण्यासाठी प्रभागात जागा नाही. प्रभागात कर्मचा–यांची कमतरता आहे करिता कर्मचारी पुरविण्यात यावेत. मोमीनपुरा येथील मोमीनपुरा दवाखान्यात कॅमेरे लागणार होते अद्याप ते लावण्यात आले नाहीत. या अनुषंगाने आरोग्य अधिकारी डॉ.दासरवार यांनी सांगितले, मोमीनपुरा येथे आयुर्वेदिक दवाखाना आणि युनानी दवाखाना असे दोन दवाखाने आहेत. आयुर्वेदिक दवाखाना टाटा ट्रस्ट कडून डेव्हलप करणार आहे त्याकरिता या दवाखान्याची पाहणी करावयाची आहे.

या अनुषंगाने मा.सभापती यांनी सुचित केले कि, येत्या एक–दोन दिवसात पाहणी करण्यात यावी.

तद्नंतर मा.सदस्य श्री.येरवार यांनी मृत्यू पावलेल्या ऐवजदार सफाई कर्मचा–यांच्या वारसदारांना नोकरीत घेण्याकरिता विभागामार्फत मृत्यू पावलेल्या कर्मचा–याचे सहमती पत्रकाची मागणी करण्यात येत आहे आणि त्यामुळे प्रकरण प्रलंबित आहेत याबाबत संबंधित अधिका–याचे लक्ष वेधले असता डॉ.दासरवार यांनी सांगितले कि, 698 प्रकरणांची स्क्रुटनी केली असता 514 प्रकरणांबाबत कोणत्याही प्रकारचे कागदपत्र मिळाले नाही. त्यापैकी 184 प्रकरण योग्य आहेत त्यांना पत्र देवून कळविले आहे. 63 लोकांना नोकरी दिलेली आहे. 18 लोकांचे प्रकरण विभागाच्या चुकीमुळे प्रलंबित आहेत. ते प्रस्ताव महासभेपुढे पाठविण्यात येत आहे.

मा.सदस्य श्री. चुटेले यांनी सांगितले कि, ऐवजदार सफाई कर्मचारी दोन–चार–सहा महिने नोकरीवर अनुपस्थित राहिले असल्या कारणाने त्याला बडतर्फ केल्यानंतर त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सुध्दा नोकरीवर घेतले जात नाही. या अनुषंगाने 3 महिन्यापर्यंत नोकरीवर अनुपस्थित असलेल्या कर्मचा–यांना विभागामार्फत पत्र पाठविण्यात यावे असे त्यांनी सुचित केले.

मा.सभापती यांनी या अनुषंगाने निर्देशित केले कि, मा.सदस्य यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे ऐवजदार सफाई कर्मचारी जर नोकरीवर दोन महिने अनुपस्थित राहत असेल तर त्याला प्रभागातील सॅनेटरी इन्स्पेक्टरच्या माध्यमातून नोटीस देण्यात यावा.

मा.सदस्या श्रीमती विशाखा बांते यांनी सफाई कर्मचा–यांच्या बाबतीत सांगितले कि, सफाई कर्मचारी हजेरी लावून घरी जातो. त्या अनुषंगाने आरोग्य अधिकारी डॉ.दासरवार यांनी सांगितले कि, सफाई कर्मचा–यांच्या बाबतीत बोगस हजेरी लावण्यात येते अशा वारंवारं तक्रारी येत आहे. प्रत्येक

प्रभागात जमादार आहे परंतु त्याच्या खाली असणा–या सफाई कर्मचा–यांची संख्या जास्त असल्यामुळे ते स्व:त जावून त्यांच्या हजेरीवर लक्ष देवू शकत नाही. याकरिता आता जेपीएस घडयाळ सफाई कर्मचा–यांना देण्यात येत आहे. सफाई कर्मचारी हजेरी लावल्यानंतर कुठे जात आहे हे त्यात दिसून येईल. त्यामुळे अशा प्रकारावर आळा बसणार आहे असेही त्यांनी सांगितले.

सरतेशेवटी मलेरिया व फायलेरिया अधिकारी श्रीमती थोटे यांनी सभेत माहिती देतांना सांगितले, डेंग्युचे 2 केसेस सापडले आहे. नाला परिसरात डेंग्युचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यामुळे झोन स्तरावर कार्यवाही करण्यास सांगितले आहे. फॉगिंगच्या संदर्भात दोन–दोन झोनचा शेडयुल्ड बनविण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

शेवटी मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, पावसाळयाच्या आधी नाला सफाई होण्याच्या दृष्टीने झोन स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी. आवश्यक व्यवस्थेसंदर्भात आरोग्य अधिकारी यांच्याशी समन्वय साधण्यात यावा. 15 तारखेला स्मार्ट सिटी अंतर्गत स्वच्छतेच्या अनुषंगाने पाहणी करण्याकरिता शासनाची टीम शहरात येत आहे. या मोहिमेअंतर्गत शहराच्या रॅकिंगमध्ये सुधारणा करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. करिता प्रत्येक मा.सदस्यांनी या कामात लक्ष देवून आपआपल्या परिसरात स्वच्छता करून घ्यावयाची आहे. काही अडचणी असल्यास आरोग्य अधिकारी यांच्याशी संपर्क साधून काम करून घ्यावयाचे आहे. बाजार परिसरात रात्री होत असलेल्या सफाईकरिता शुल्क आकारण्यासंदर्भात विभागामार्फत प्रस्ताव पाठविण्यात यावा. मा. सदस्यांनी सुचनाकडे विभागामार्फत लक्ष पुरविण्यात यावे असे सुचित करून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती**